# Marathi Bhasha Pandharwada 2023

## 14th-28th January 2023




## I Basic Details

| **Date, Time** | **Faculty** | **Department/ Committ ee** | **Co-ordinator name** |
|---|---|---|---|
| 14th - 28th January 2023 | Arts | Education | Dr. Shakuntala Nighot |
| **Time: 10am-1pm** | **Venue** | **Activity for Class/Group with Total Number of Attendees** | **Nature: Indoor/Outdoor** |
| During college hours | STIE, 2nd floor. | 96 Students, College Staff (Competitions: 47 Students of FYBEd) | Indoor |
| **Names of Staff Members who supported** | | | **Names of Students who Supported** |
| Teaching staff of STIE. | | | FYBEd Class |

## II Brief Information about the Activity

| | |
|---|---|
| Topic/Subject of the Activity | Marathi Bhasha Pandharwada Celebration |
| Objectives for conducting Activity | • To celebrate Maharatrian culture and traditions through various activities.<br>• To make the students aware of different Marathi literature, folk art and songs through quizzes, movies, dance, rangoli, elocution competitions.<br>• To encourage the students for participating in events and develop skills such as communication, creativity and management.<br>• To develop a sense of oneness and respect towards different cultures and traditions. |
| Methodology | • The Pandharwada was celebrated in the college which included different activities, competitions and events.<br>• The students attempted the quizzes on Marathi literature and cinema through google form.<br>• The food fest was conducted in the college where the students made the Maharatrian dishes in groups and presented them with their significance.<br>• Rangoli and painting competition was held to enhance creativity and was judged later. The students watched a movie and discussed the value given through it.<br>• The handwriting competition was held which checked the vocabulary and presentation of the students.<br>• The elocution and speech competitions made the students aware of the Marathi literature and information related to Maharatrian jewelry and forts.<br>• A program was held that depicted the Vasai,Koli, Lezim and Lavni dance.<br>• The events were held in the college hours under the supervision of Sr. Tanuja and Teaching Staff. |
| Outcome | • The participants developed a sense of oneness.<br>• The participants gained a better understanding of various Marathi literature, folk dances and songs.<br>• The participants presented,tasted and made the Maharatrian cuisines and snacks.<br>• The participants were enthusiastic and confident to present their culture and traditions. |

## III Photo: Rangoli



## Maharashtrachi Khadyajatra




## Rangoli, Drawing, Quiz Participants in action












## Elocution and KavyaVachan




## Marathi Veshabhusha



**Mee Marathi**




मराठी भाषा संवर्धन पंधरवडा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२३

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा, कार्यक्रम कमी उत्सवच जणू! मराठी भाषा आणि संस्कृतीची ज्योत मना-मनात जागा ठेवणारा पंधरवडा, सेंट तेरेसा इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन मध्ये अगदी उत्साह, उल्हासाने पार पाडला जातो. दर वर्षी हा कार्यक्रम १४ ते २८ जानेवारी ह्या दिवसांत साजरा केला जातो. दर वर्षी विविध कार्यक्रम अयोजन केले जातात. २०२३ या वर्षी प्रथम वर्षीय बीएडच्या विद्यार्थ्यांनींनी सिस्टर तनुजा वाघमारे आणि ग्रंथपाल डॉ. शकुंतला निघोट यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम आयोजित केले आणि प्रथम वर्ष बी.एड. च्या सर्व विद्यार्थिनींनी उत्साहाने त्यात सहभाग घेतला.

१४ जानेवारी २०२३ रोजी या अंतर्गत "मराठी साहित्य व संस्कृतीवर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा" आयोजित करण्यात आली. प्रथम वर्षाच्या प्रत्येक विद्यार्थिनींनी या प्रश्नमंजुषेत अगदी उत्साहाने सहभाग घेतला. या प्रश्नमंजुषेतुन मराठी भाषेच्या समृद्ध, साहित्य, संस्कृती, परंपरा व इतिहासाची ओळख विद्यार्थ्यांना झाली.

१६ जानेवारी २०२३ रोजी "मुरंबा" या मराठी चित्रपट प्रदर्शनाचे अयोजन केले गेले. सध्याच्या पिढीतील नातेसंबंध आणि वैयक्तिक वाढ यांचा समतोल कसा साधावा यावर प्रकाश टाकण्यासाठी या चित्रपटाची निवड करण्यात आली. पालकांनी मुलांशी सुसंवाद साधण्याची गरज या चित्रपटात अधोरेखित केली आहे

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अंतर्गत "मराठी हस्ताक्षर आणि शुद्धलेखन स्पर्धा" आयोजित करण्यात आली. सर्व विद्यार्थिनी ह्या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. बऱ्याच दिवसांनी आम्ही मराठी लिहिण्याचा आनंद घेतला. मराठी भाषा जर जपायची असेल तर ती फक्त बोलून किवा समजून पुरेशी नाही तीला लिखाणातून सुद्धा जपायला हवी असे मनोगत विद्यार्थिनींनी व्यक्त केले.

१८ जानेवारी २०२३ रोजी रांगोळी आणि चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मनातील भावना व्यक्त करण्याचे, आपले विचार कागदावर उतरविण्याचे माध्यम म्हणजे रंगात बुडवलेला कुंचला त्याच्या मदतीने विद्यार्थिनींनी मराठी संस्कृतीवर प्रकाश टाकला. एकुण १२ जणांनी ह्या स्पर्धेत भाग घेतला होता. सहभागी व्यक्तिंना १.५ तासांचा अवधी दिला गेला होता. वारली चित्रकला, मराठी संकृती, शिवाजी महाराज, इ.विषयांवरील चित्रांनी वातावरण रंगीबेरंगी झाले.

रांगोळी स्पर्धेत विद्यार्थिनींना एकूण 7 गटांमध्ये विभागले गेले होते. प्रत्येक गटाने महाराष्ट्राची संस्कृती व इतिहास दर्शवणाऱ्या सुबक रांगोळ्या रेखाटल्या.

महाराष्ट्रातील विविध खाद्यपदार्थांची माहिती मिळावी यासाठी २० जानेवारी २०२३ रोजी "महाराष्ट्राची खाद्यजत्रा" चे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक विद्यार्थिनीने महाराष्ट्राच्या खाद्य संस्कृतीतला एक-एक पदार्थ आणून प्राचार्य, शिक्षिका आणि वर्गमैत्रिणींसमोर सादर केला. सर्वांनी उत्साहाने चिकन कोल्हापुरीपासून वडापाव पर्यंत, कोकणच्या सोल-काडी, कोकम सरबतापासून वसईच्या अनेक मांसाहारी पदार्थांपर्यंत एकूण ४८ विविध पदार्थांचे त्यांच्या वैशिष्टयांसह सादरीकरण केले गेले. आणले होते. प्रत्येकाने आपापल्या खाद्यपदार्थाची मराठीत थोडक्यात माहिती सांगितली आणि मग तोंडाला पाणी आणणाऱ्या सर्व मेजवानीचा मनसोक्त अस्वाद घेतला.

२० जानेवारी २०२३ रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथपालांनी (डॉ. शकुंतला निघोट ) "उत्खनन विनामूल्य ऑनलाईन मराठी माहिती संसाधनांचे" **(Information Retrieval Of Free Online Marathi Books and Information Resources**) या कार्यशाळेतून विद्यार्थिनींसमोर नॅशनल डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया, ई-साहित्य, नेटभेटः मराठी पुस्तके, ई-मराठी पुस्तके, पीडीएफ ड्राइव्ह, मराठी विश्वकोश इत्यादी संकेतस्थळाद्वारे मराठी साहित्य व पुस्तकांचे भांडार खुले केले. मराठी टंकलेखनासाठी Google Input Tools व Google Docs वर Voice Typing इत्यादी सुविधा प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थ्यांना शिकवण्यात आल्या.

२३ जानेवारी २०२३ रोजी सेंट तेरेसा इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन मध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अंतर्गत **"**एकांकिका,वक्तृत्व आणि काव्य वाचन" कार्यक्रम आयोजित केला गेला. विद्यार्थिनींनीमध्ये मराठी बोलण्याचे कौशल्य वाढावे आणि त्या भाषेत बोलताना आत्मविश्वास निर्माण व्हावा हा कार्यक्रमाचा मुख्य हेतू होता. कु श्रुती चिखलकर हिने कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन केले. प्रिस्का कोट्स हिने 'पिंजरा', आईशा सय्यद हिने 'कान्ना', निसा शेख हिने 'प्रेम', पावलीन डिसोजा हिने 'नशिब', कॅरल फर्नांडिस हिने 'जीवनाचे सार' आणि अँड्रिया डिसोझा हिने 'मैत्रीण' अश्या प्रसिध्द कविता सादर केल्या. निमिषा कदम हिने 'चारचौघी' या नाटकावर नाट्य समीक्षा सादर केली.त्यानंतर ऐश्वर्या बांबरकर हिने मराठी स्त्रियांचे दागिने आणि प्रिस्का कोट्स हिने महाराष्ट्रातील किल्ले या विषयावर वक्तृत्व केले.
ह्या कार्यक्रमाची सांगता ग्रंथपाल शकुंतला मॅम ख्याध्यापिका सिस्टर तनुजा वाघमारे यांचे आभार मानून झाली.

२४ जानेवारी २०२३ रोजी
**"**जरा डोके चालवा" ही गमतीशीर प्रश्नमंजुषा तसेच "मराठी वेषभूषा" या दोन कार्यक्रमांचे आयोजन केले गेले
.
महाराष्ट्राचा इतिहास, मराठी संस्कृती, चित्रपट व गाणी यांची ओळख व आवड विद्यार्थिनींना व्हावी म्हणून एक मनोरंजक प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. प्रिस्का कोट्स, हॅना गॉडफ्री, जोलीन फर्नांडो, अंजू मारिया वर्घेसे, निमिषा कदम आणि ब्लेसि रिबेल्लो ह्यांनी या प्रश्नमंजुषेचे आयोजन केले. ६ गटात विभागलेल्या व अस्सल मराठमोळ्या वेशभूषेत नटलेल्या साऱ्या विद्यार्थिनीनी या खेळीमेळीच्या वातावरणात हमखास धमाल केली.

२ फेब्रुवारी २०२३ या दिवशी **"**मी मराठी" या मनोरंजनात्मक कार्यक्रमाद्वारे अनेक विलोभनीय नृत्य व गायन अविष्कार साजरे केले गेले. या कार्यक्रमाला सिस्टर तनुजासह सर्व शिक्षिकांची,द्वितीय वर्षीय आणि प्रथम वर्षीय बीएड विद्यार्थीनींची मोलाची उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरूवात गणेश वंदनाने झाली. नंतर महाराष्ट्राचे लोकनृत्य लेझीम ने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.मग मराठी अभिमान गीत, वसईची सुमधुर लोकगीते आणि लोकनृत्याचे सुंदर सादरीकरण केले. त्यानंतर लावणी नृत्य सादर करण्यात आले. कोळी लोकनृत्याद्वारे कोळी संस्कृतीचे आणि भाषेचे सुंदर प्रदर्शन केले होते. पुढे प्रसिद्ध दादा कोंडके यांच्या गाण्यावर आणि लोकांच्या आवडत्या झिंगाटवर नृत्य सादर करण्यात आले. कार्यक्रमाची अखेर नवराईच्या आणि महाराष्ट्राच्या जय जय काराने झाली.

सर्व मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.पंधरवड्याचा शेवटचा दिवस टाळ्यांच्या कडकडाटाने झाला